## बदलत्या वातावरणातील आजार टाळण्यासाठी करा घरगुती उपाय

**सतत बदलत्या हवामानामुळे साथीचे रोग पसरत आहेत. मुंबईत नेहमीप्रमाणे यंदाही पावसाळ्यात साथीचे रोग पसरण्यास सुरुवात झाली असून अनेक मुंबईकर यामुळे आजारी पडले आहेत. मुंबई महापालिकेच्या आणि खासगी रुग्णालयांमध्ये सध्या साथीच्या रोगांमुळे आजारी पडलेल्या रुग्णांची गर्दी दिसून येत**



**आले :** सर्दी खोकल्यावरील गुणकारी औषध म्हणून प्रचलित आहे. आल्याचा रस व मध सम प्रमाणात बाटलीमध्ये साठवून दोन-दोन चमचे दोन वेळा घेतल्यास सर्दी, खोकला, पडसे आणि स्वरभंग बरे होतात. अजीर्ण झाल्यास आल्याच्या रसात लिंबाचा रस व मीठ घालून पाणी प्यावे. आले तोंडात ठेवताच लाळग्रंथी सक्रिय होतात.

**तुळस :** ताप आल्यावर तुळशीचा रस पायल्यानंतर ताप कमी होतो. मलेरिया आणि डेंग्यू झाल्यानंतरही तुळशीचा रस प्यायल्यावर आराम मिळतो. रोग प्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी आणि वार्धक्य कमी करण्यासाठी तुळशीचा रस प्यायल्याने फायदा मिळेल. तुळशीमध्ये इगेनॉल हे द्रव्य असल्याने मधुमेह रोगावर नियंत्रण मिळवण्यासाठी ही फायदा होतो. आताच्या बदलत्या वातावरणात बाहेरचे पदार्थ खाणे शक्यतो टाळा. त्याचप्रमाणे वेळेत डॉक्टरांचा सल्ला घ्यायला मात्र विसरू नका.



## चेहऱ्यावरून अकाली प्रौढत्वाच्या खुणा नाहीशा करण्यासाठी आजमावा हे उपाय

**चाळिशी उलटून गेल्यानंतर चेहऱ्यावर दिसू लागणाऱ्या प्रौढत्वाच्या खुणा आजकालच्या काळामध्ये ऐन विशीमध्येच काहींच्या चेहऱ्यांवर दिसून येतात. अयोग्य, असंतुलित आहार, व्यायामाचा अभाव, तणावपूर्ण जीवनशैली, सौंदर्यप्रसाधनांचा सातत्याने वापर, सतत उन्हामध्ये त्वचेवर येणारे काळसर डाग, यामुळे ऐन पंचविशीतील तरुण-तरुणी चाळिशी पार केल्यासारखे दिसू लागतात. चेहऱ्यावर पिग्मेंटेशन दिसू लागते, बारीक सुरकुत्या पडू लागतात, त्वचा निस्तेज, कोरडी दिसायला लागून, ढिली पडून लटकूही लागते. या सर्व गोष्टींमुळे चेहरा अनाकर्षक दिसू लागतो. या सर्व समस्या टाळून चेहऱ्यावरून अकाली प्रौढत्वाच्या खुणा नाहीशा करण्यासाठी काही नैसर्गिक उपाय आजमावता येऊ शकतात.**

**अननस :** चेहऱ्यावरील त्वचा ढिली पडून अनेक ठिकाणी लटकल्याप्रमाणे दिसू लागते. त्वचा पुन्हा 'firm' बनवण्यासाठी अननसाचा वापर हा चांगला पर्याय ठरतो. अननसाचा वापर करण्यासाठी अननसाची साले काढून टाकावीत. अननसाच्या गराचे बारीक तुकडे करून घेऊन हे तुकडे चेहऱ्यावरून हळुवार हाताने फिरवावेत, अथवा अननसाचा गर पिळून रस काढून घ्यावा आणि हा रस चेहऱ्यावर लावावा. हा रस काही वेळ चेहऱ्यावर राहू देऊन त्यानंतर थंड पाण्याने चेहरा स्वच्छ धुवावा. हा उपाय काही दिवस दररोज करावा.

अननसाचा रस नैसर्गिक 'astringent' असल्याने ढिली पडलेली त्वचा पुन्हा कसण्यास हा रस अतिशय उपयुक्त ठरतो. हा उपाय अवलंबायचा झाल्यास आपण वापरणार असलेले अननस ताजे आणि पिकलेले असल्याची खात्री करून घ्यावी. तसेच अननसाचा रस आधी मनगटाच्या आतील बाजूला लावून पाहावा आणि काही वेळ वाट पहावी. या रसामुळे कोणत्याही प्रकारची ॲलर्जी नसल्याची खात्री पटल्यानंतरच हा रस चेहऱ्यावर लावावा.





**आहार :** आपल्या आहारामध्ये सुका मेवा, तेलबिया, अंडी, मासे, डाळी, मटार, शेंगभाज्या, ताजी फळे, टोमॅटो, हिरव्या पालेभाज्या इत्यादी पोषक अन्नपदार्थांचा समावेश असेल याची काळजी घ्यावी. आपल्या आहारामध्ये तळलेले पदार्थ, प्रोसेस्ड अन्नपदार्थ, अल्कोहोल, कार्बोनेटेड किंवा कॅफिनेटेड पेये, साखरेचे प्रमाण जास्त असल्यास त्यामुळे त्वचेच्या नव्या पेशी तयार होण्यामध्ये अडचण येत असते. त्यामुळे अशा पदार्थांचे सेवन आपल्या आहारामध्ये अतिशय मर्यादित असावे.

**कोरफड :** चेहऱ्यावरील अकाली प्रौढत्वाच्या खुणा नाहीशा करण्यासाठी कोरफडीचा ताजा गर वापरावा. कोरफडीच्या ताज्या गरामध्ये गुलाबजल घालून पेस्ट तयार करावी. ही पेस्ट चेहऱ्यावर लावून हलक्या हाताने मालिश करावी. ही पेस्ट चेहऱ्यावर वीस मिनिटे राहू देऊन यानंतर थंड पाण्याने चेहरा धुवून टाकावा. कोरफडीचा गर आणि गुलाबजल मिसळून तयार केलेल्या पेस्टमुळे चेहऱ्यावरील सुरकुत्या नाहीशा होण्यास मदत होते. कोरफडीमुळे चेहऱ्यावरील टिश्यू रिपेअर होण्यास मदत होऊन त्वचा तजेलदार दिसू लागते. कोरफडीप्रमाणे टी ट्री ऑइल आणि ऑलिव्ह ऑइल यांचे मिश्रणही चेहऱ्यावरील सुरकुत्या कमी करून त्वचा तजेलदार बनण्यास सहाय्यक आहे.

**टी ट्री – ऑलिव्ह ऑइल :** एक लहान चमचा टी ट्री ऑइल, एक मोठा चमचा ऑलिव्ह ऑइलमध्ये मिसळून याने रात्री झोपण्यापूर्वी चेहऱ्यावर मालिश करावी. हे तेल रात्रभर चेहऱ्यावर राहू देऊन सकाळी चेहरा थंड पाण्याने धुवावा.

## सात फायदे लसूण आणि मध एकत्र मिक्स करून खाण्याचे...

**लसूण मसालेदार खाण्याचे स्वाद वाढवतो. तसेच याचे गुणकारी आणि आरोग्यदायी फायदे खूप आहेत. लसूण आणि मध एकत्र मिक्स केल्याने आरोग्याचा खूप मोठा खजिना तुमच्याकडे येतो. असे केल्याने सौंदर्यासंबंधी समस्या दूर होऊ शरीर डिटॉक्स करण्यासाठी खूप मदत करतो. तसेच इन्फेक्शनही संपवतो. अशात मध आणि लसूण खाल्ल्यास सात फायदे होतात.**

**हृदयाला निरोगी ठेवतो :** लसूण आणि मध यांचे मिश्रण खायाने हृदयाकडे जाणाऱ्या धमण्यांमधील ब्लॉकेजेस निघून जातात. यामुळे ब्लड सर्क्युलेशन योग्य प्रकारे हृदयापर्यंत पोहोचते.

**सर्दी आणि पडसं दूर करते :** हे मिश्रण खाल्ल्याने सर्दी आणि पडशासह सायनसचा प्रॉब्लेम खूप कमी होतो. हे मिश्रण शरीरातील उष्णता वाढवते. आजारांना दूर ठेवते.

**इम्युन सिस्टीमला मजबूत करते :** लसूण आणि मधाच्या मिश्रणाने तुमची इम्युन सिस्टिम मजबूत होते. यामुळे तुम्ही प्रत्येक ऋतूमध्ये तंदुरुस्त राहू शकता.

**डायरियापासून बचाव :** कोणाला किंवा लहान मुलांना सतत डायरियाचा त्रास होत असेल तर त्यांना हे मिश्रण खाऊ घाला. त्यांची पचन संस्था दुरुस्त होईल. तसेच पोटातील इन्फेक्शन दूर होईल.



**डिटॉक्स :** हे एक नैसर्गिक डिटॉक्स मिश्रण आहे. हे खाल्ल्याने शरीरातील घाण आणि वेस्ट मटेरियल बाहेर पडते.

**फंगल इन्फेक्शन :** फंगल इन्फेशन, शरीराच्या कोणत्याही भागावर हल्ला करत असेल तर ॲण्टी बॅक्टेरियल गुणांचे हे मिश्रण त्या ठिकाणी लावल्यास बॅक्टेरिया दूर होतात. शरीर कमजोर होण्यापासून वाचते.

**घशाच्या इन्फेक्शनमध्ये लाभदायक :** हे मिश्रण घशातील संक्रमण दूर करते. यात ॲण्टी इन्फ्लेमेटरी गुण आहे. घशातील खरखर आणि सूज कमी करण्यास मदत करते.

## साखरेच्या ऐवजी मिठाई बनवताना वापरा खजुराची पेस्ट

**आपल्या दैनंदिन आहारामध्ये साखरेचा वापर होत असतो. चहा, कॉफी आणि मुख्य म्हणजे आपल्या आहारातील बहुतेक सर्वच गोड पदार्थांमध्ये साखरेचा वापर नियमित केला जात असतो. केवळ घरी तयार करण्यात आलेल्या पदार्थांतच नव्हे, तर ब्रेड, बिस्किटे, तयार सॉसेस, सँडविच स्प्रेड्स, पॅकेज्ड फळांचे रस, कोल्ड ड्रिंक्स यामध्येही साखरेचे प्रमाण जास्त असते.**

**रिफाइंड** साखर अतिप्रमाणात खाल्ल्याने आरोग्याला धोका निर्माण होत असून, तरुण वयातच उच्च रक्तदाब, मधुमेह इत्यादी विकार उद्भवण्याचे प्रमाण वाढले आहे. आहारामध्ये साखर जास्त असल्याने चेहऱ्यावर अकाली सुरकुत्या येणे, वारंवार मुरुमे, पुटकुळ्या येणे इत्यादी लक्षणे दिसू लागतात. त्यामुळेच आहारतज्ज्ञ दैनंदिन आहारामधून साखरेचे प्रमाण कमी करून साखरेच्या ऐवजी नैसर्गिक स्वीटनर्स वापरण्याचा सल्ला देत असतात. नैसर्गिक स्वीटनर्समध्ये अनेक पर्याय उपलब्ध असून त्यामध्ये खजुराच्या पेस्टचा समावेश करता येऊ शकतो.

खजुराची विशेषतः अशी की, त्यामध्ये नैसर्गिक शुगर्ससोबत प्रथिने, फायबर, झिंक, मॅग्नेशियम इत्यादी क्षारही आहेत.

शंभर ग्राम खजुरामध्ये २८२ किलो कॅलरीज इतकी ऊर्जा असते. त्यामुळे खजुरापासून तयार केली गेलेली पेस्ट किंवा सिरप रिफाईन्ड साखरेच्या ऐवजी वापरले जाऊ शकते. खजुराची पेस्ट घरच्या घरी तयार करण्यासाठी केवळ खजूर आणि स्वच्छ पाणी, इतक्याच साहित्याची आवश्यकता आहे.



खजुराची पेस्ट बनवण्यासाठी ताजा पिकलेला खजूर पाण्यामध्ये भिजवून ठेवावा. खजूर भिजवण्याआधी त्याच्यातील बिया काढून टाकाव्यात. त्यानंतर गरम पाण्यामध्ये खजूर भिजवावा. हा खजूर रात्रभर पाण्यामध्ये भिजू द्यायचा आहे.

दुसऱ्या दिवशी सकाळी खजूर पाण्यातून काढून घेऊन मिक्सरवर बारीक वाटावा. खजूर भिजवून ठेवलेले पाणी टाकून न देता हे पाणी खजूर मिक्सरवर वाटत असताना घालावे. आवश्यक तितके पाणी घालून आपल्याला हवी तितकी घट्ट किंवा पातळ पेस्ट तयार करून घ्यावी. या पेस्टमध्ये किंचित मीठ, आवडत असल्यास मध किंवा दालचिनीची पूड मिसळता येईल. यामुळे या पेस्टला आगळीच चव येते. खजुराचे सिरप तयार करण्यासाठी खजूर पाण्यामध्ये उकळून घ्यावेत. त्यानंतर खजूर उकळलेले पाणी गाळून घेऊन खजुराचा गर वेगळा करावा. गाळलेले पाणी पुन्हा उकळत ठेवून पाकाप्रमाणे दिसेपर्यंत आटवावे. तयार झालेले सिरप थंड झाल्यावर बाटलीमध्ये भरून ठेवावे. खजुराच्या सिरपपेक्षा खजुराची पेस्ट अधिक चांगली, कारण या पेस्टमध्ये फायबर असते.

## जिमला जाताय... तर लक्षात ठेवा

- ■ जिम सुरू करण्याआधी आणि जिमिंग झाल्यानंतर लगेच पाणी किंवा ज्यूस पिणे टाळा.
- ■ आपण किती कॅलरीज कमी करतोय किंवा घेतोय याचा हिशोब असू द्या.
- ■ वजन कमी करण्यासाठी किंवा फिटनेससाठी लहान-लहान लक्ष्य निर्धारित करा.
- ■ ट्रेनरचा सल्ला घेतल्याशिवाय दुसऱ्यांना पाहून कोणतीही नवीन मशीन ट्राय करू नका.
- ■ जिमसाठी योग्य तेच कपडे आणि जोडे निवडा.
- ■ जिममध्ये घाम पुसण्यासाठी नेहमी स्वच्छ नॅपकिन वापरा.
- ■ कोणतीही मशीन वापरण्यासाठी नीट प्रशिक्षण घ्या आणि क्षमतेहून अधिक वर्कआऊट टाळा.
- ■ एखाद्या व्यायामाने आपले अंग दुखत असेल किंवा स्नायू खेचले जात असतील तर लगेच तो व्यायाम बंद करा.
- ■ कोणत्याही कंपनीचे प्रोटीन शेक किंवा एनर्जी ड्रिंक सेवन करण्याआधी तज्ज्ञांचा सल्ला घ्या.
- ■ जर आपल्याला एखादे संक्रमण किंवा रोग असेल तर आधीच त्याची माहिती जिम ट्रेनरला द्या.

**फेफरे (फिट्स) हा आजार आपल्या मेंदूशी संबंधित आहे. आपल्या मेंदूमध्ये अतिसुक्ष्म वाहिन्या असतात, त्यांना न्यूरॉन असे म्हटले जाते. न्यूरॉन आपापसात नेहमी संपर्कात असतात. एकमेकांना संदेशाचे आदानप्रदान करत असतात. संदेश वहन करण्याचे कार्य इतक्या प्रचंड वेगाने होत असते की, त्याने आपल्या मेंदूत रासायनिक व विद्युत तरंग निर्माण होतात. परंतु, एखाद्या संदेशाचे व्यवस्थित वहन न होता तो वाहिनीत अडकून पडतो. मेंदूचे संतुलन बिघडते व त्यामुळे आपल्याला फिट्स येतात. पण घाबरून जाऊ नका. फिट्सवर घरगुती उपचार आहेत.**

## फिट्स आल्यास घाबरू नये

**फिट्स** दोन मिनिटांपेक्षा जास्त वेळाची नसते. ती केव्हाही व कोणत्याही वयाच्या व्यक्तीला येऊ शकते. अचानक आपल्याला चक्कर येऊन आपण जमिनीवर पडतो व शुद्ध हरपते. फिट्स आल्यानंतर आपल्या हातापायात कंप निर्माण होतात. तोंडातून फेस येतो. वारंवार फिट्स येत असेल तर आपल्याला खालील टिप्स उपयोगी पडू शकतात.

- ■ अक्कलकाढा १०० ग्रॅम व लिंबू सत्त १०० ग्रॅम यांचे मिश्रण मधामध्ये एकजीव करून ५ ग्रॅम प्रतिदिन सकाळी काहीही न खाण्यापूर्वी चाखल्याने फिट्स येणे कायमचे दूर होते.
- ■ सालवटीचे चूर्ण एक ग्रॅम प्रतिदिन मधासोबत चाखावे. त्यानंतर दूध प्यावे. असे नियमित केल्याने जुनाट फिट्स दूर होतात.
- ■ शुद्ध हरपलेल्या व्यक्तीला लसूण कुटून वास दिल्यास तो शुद्धीवर येतो.
- ■ रोज ३-५ लसणाच्या पाकळ्या दुधात टाकून ते प्यायल्याने फिट्स येत नाहीत.

## आरामदायक 'ट्रेंडी' पँट



**फॅशनच्या** जगात महिलांसाठी पँटचे पुनरागमन झाले आहे. पॅरिस फॅशन शो असो की लक्मे फॅशन वीक सगळीकडे पँट्स परिधान केलेल्या मॉडेल दिसू लागल्या आहेत. एवढंच नव्हे तर फॉर्मलशिवाय याचा उपयोग कॅजुअल्समध्ये देखील होताना दिसत आहे.

सध्या कॉर्पोरेट कल्चरमुळे कपडे घालण्याच्या पद्धतीत कमालीचा बदल जाणवत आहे. मुली फॅशनसोबतच आरामालाही महत्त्व देत आहेत. म्हणूनच जीन्स-ट्राऊजरसारखे कपडे मुलींची पहिली पसंत झाली आहे. पिकनिक, आऊटिंग किंवा वीकेंडला जीन्स परिधान करताना दिसत आहेत. पण मीटिंग, कॉन्फरन्स, ऑफिशियल पार्टी किंवा सेमिनारच्या वातावरणात हे फिट बसत नाही. म्हणूनच मुलींनी आता पँट-ट्राऊजरला प्रमुख पोशाखांमध्ये सहभागी केले आहे. त्यातही विविध प्रकार आहेत. - ट्राऊजर, सिक्स पॉकेट, कार्गो, बूट कट आदी.

तुम्ही ऑफिस व्यतिरिक्त टी पार्टी किंवा डिनर पार्टीत सिल्क शर्टासोबत पँट परिधान करू शकता.

पँट आरामदायक असल्यामुळे हल्ली मोठ्या इन्स्टिट्यूटनी शर्ट-पँट हा युनिफॉर्म म्हणून स्वीकारला आहे. एअरलाइन्स, हॉस्पिटलच्या व्यतिक्ति काही बँका आणि कॉलेजमध्ये आता मुली युनिफॉर्म म्हणून पँट-शर्ट परिधान करायला लागल्या आहेत. त्याने स्मार्टनेस वाढतोच आणि धावपळीची कामे सोपी होतात. पँटसोबत साधारण कॉटन शर्ट असो किंवा सिल्क व जॉर्जेटचे शर्ट अगदी सर्व मॅच करतात. एखाद्या डिनर पार्टीत एक शानदार स्कार्फ किंवा शालसुद्धा पँट-शर्ट सोबत छान दिसते. तसेच त्यावर बीडसची माळ, डायमंड नेकलेस किंवा नेकपीस, ब्रेसलेट, लेदर बेल्ट, कॉर्पोरेट बॅग्जपासून क्लच आणि पर्स हेही मॅच होते. पँट परिधान केल्यास लेदर शूज, सँडल, ट्रेंडी चप्पलसुद्धा परिधान शकता. त्याचबरोबर आपण पिकनिक आणि खेळण्यासाठी कार्गो किंवा सिंपल बूट कट देखील वापरू शकता.

> **पँटसोबत साधारण कॉटन शर्ट असो किंवा सिल्क व जॉर्जेटचे शर्ट अगदी सर्व मॅच करतात. एखाद्या डिनर पार्टीत एक शानदार स्कार्फ किंवा शालसुद्धा पँट-शर्ट सोबत छान दिसतो.**



## वेळ सत्कारणी लावा

**बयापैकी** श्रीमंत असलेल्या कुटुंबाच्या काही सवयी असतात. विशेषतः वृद्ध स्त्रियांना पेपर वाचायचा असतो. सकाळ-संध्याकाळ बाहेर फिरून यायचे असते. ठरावीक पदार्थाचा आस्वाद घ्यायचा असतो. वैयक्तिक अशी त्यांची कामे त्यांना करायची असतात. इतकेच नव्हे; तर आपले आरोग्य उत्तम राहण्यासाठी व्यायामही करायचा असतो. तेवढे पथ्यही त्यांना पाळायचे असते. वेळच्या वेळी औषध घेणे आणि आरोग्य अबाधित ठेवण्यासाठी सोबतीला कोणी मदतनीस स्त्री मिळाली तर ती त्यांना हवी असते. ज्यांना अशा सेवेत रूची आहे, त्यांना ही कामे करता येतील.

आई-वडिलांकडे लक्ष देता यावे म्हणून काही मुले-मुली खासगीरीत्या नर्स ठेवत असतात. पण ही नर्स फक्त आरोग्याची देखभाल करते. आपण पुढाकार घेतला तर सोप्या गोष्टी करता येणे शक्य आहे.



## वाढतं वजन थांबवायचंय ? मग आहारात करा या घटकांचा समावेश

**बदलत्या जीवनशैलीमुळे वाढतं वजन ही प्रत्येकाची समस्या झाली आहे. त्यामुळे वाढलेले वजन कमी करण्याचा अनेक जण वेगवेगळ्या पद्धतीने प्रयत्न करत असतात. अनेक वेळा डाएट करूनही वाढलेल्या वजनाला आळा बसत नाही. अशा वेळी आहारामध्ये वजन कमी करण्यास मदत करणाऱ्या पदार्थांचा समावेश करायला हवा. या पदार्थांच्या सेवनामुळे वारंवार लागणाऱ्या भुकेला आळा बसतो.परिणामी वजन लवकर वाढत नाही. असेच काही पदार्थ रुपम सिन्हा यांनी सांगितले आहेत.**

**लाल मिरची**

रोजच्या जेवणाला झणझणीतपणा येण्यासाठी अनेक वेळा गृहिणी भाजी, आमटीमध्ये लाल मिरची किंवा लाल तिखटाचा वापर करतात. मात्र जेवणाची रंगत वाढवणारी लाल मिरची वजन कमी करण्यासाठीदेखील तितकीच उपयोगी आहे. लाल मिरचीमध्ये कॅप्सॅकीन संयुग असतात. कॅप्सॅकीनमुळे शरीरातील मेटाबोलिज्म वाढविण्यास मदत होते. परिणामी वाढत्या वजनाला आळा बसतो.

**लसूण**

एखाद्या पदार्थाला खमंग फोडणी द्यायची असेल लसूण गरजेचाच आहे. मात्र लसणाचा उपयोग केवळ जेवणासाठीच होत नसून आजारपणातही होतो. अनेक वेळा आजारपणामध्ये लसणाचा वापर औषध म्हणून केला जातो. त्याप्रमाणेच वजन कमी करण्यासाठीदेखील लसणाचा उपयोग होतो. जेवणामध्ये लसणाचा समावेश असेल तर जेवताना पोट भरलंय ही भावना मस्तिष्कापर्यंत पोहोचवण्याचं काम लसूण करतो. त्यामुळे पोट भरल्यानंतर आपण आपोआप जेवायचं थांबवतो. त्यामुळे आहारात लसणाचा समावेश करायला हवा. त्यासोबतच रक्ताच्या गुठळ्या होण्यापासून लसूण मदत करतो. तर हृदयाचे आरोग्यही नीट राहते.



**लाल आणि हिरवी मिरची**

मसाल्याच्या पदार्थांमधील महत्त्वाचा घटक म्हणजे मिरची. लाल मिरचीप्रमाणेच सुकी लाल मिरची किंवा हिरवी मिरची यांचाही तितकाच शरीराला फायदा होतो. मिरचीमध्ये व्हिटॅमिन ए, सीसोबतच बीटा कॅरोटिन असतं. त्यामुळे योग्य प्रमाणात मिरचीचं सेवन केलं तर पचनक्रिया सुधारते आणि भूक नियंत्रणात राहते.

**दालचिनी**

भूक नियंत्रणात ठेवण्याचं महत्त्वाचं काम दालचिनी करत असते. दालचिनीमुळे शरीरातील अतिरिक्त चरबी कमी होते. त्यासोबतच दालचिनीच्या सेवनामुळे शरीरातील मेटाबोलिज्म वाढविण्यास मदत होते. दालचिनीमुळे धमन्यांचं कार्यही सुधारते आणि शरीरातील वाढलेल्या कोलेस्ट्रॉलची पातळी नियंत्रणात आणली जाते.

**कोकम (आमसूल)**

आंबट, चटपटीत अशी चव असणाऱ्या कोकमाचे अनेक फायदे आहेत. भूक नियंत्रणात आणण्यासाठी कोकमचा उपयोग करण्यात येतो. त्यामुळे जेवणापूर्वी रोज एक कोकम खावं.

## चव वाढवणाऱ्या चक्रीफुलाचे असेही गुणकारी फायदे

**गरम मसाल्यांसाठी प्रसिद्ध असलेलं राष्ट्र म्हणजे भारत. त्यामुळे प्रत्येक भारतीय व्यक्तीच्या स्वयंपाक घरामध्ये गरम मसाल्याचे पदार्थ हमखास आढळतात. जेवणाची चव वाढवणाऱ्या या पदार्थांपैकी काहींचा वापर आजीबाईच्या बटव्यासाठीही केला जातो. त्यामुळे चवीसोबतच हे पदार्थ गुणकारी असल्याचं दिसून येतं. मसाल्याच्या पदार्थांमध्ये महत्त्वाचा मानला जाणारा घटक म्हणजे चक्रीफूल. चक्रीफूल केवळ मसाल्याची चव वाढवत नसून त्याचे अन्यही काही गुणधर्म आहेत. इशा त्यागी यांनी चक्रीफुलाचे काही गुणधर्म सांगितले आहेत. ते पुढील प्रमाणे**



**वाढत्या वयाची लक्षणे थांबवण्यासाठी**

वय वाढायला लागलं की त्याच्या खुणा चेहऱ्यावर आपोआप दिसू लागतात. त्यामुळे अनेक वेळा तरुणी किंवा महिला प्रसाधनांचा वापर करून वाढत्या वयाच्या खुणा लपवण्याचा प्रयत्न करतात. मात्र आपल्या आहारात समावेश केलेल्या पदार्थांमुळेदेखील ही समस्या टाळता येऊ शकते. रोजच्या जेवणामध्ये वापरण्यात येणाऱ्या मसाल्यामध्ये चक्रीफूल हे महत्त्वाचं काम करत असतं. चक्रीफूल वाढत्या वयाच्या खुणा लपवण्याचं काम करतं. यामध्ये व्हिटॅमिन 'ए' आणि 'सी'चे प्रमाण मोठ्या प्रमाणावर असते. त्यासोबतच त्यात अँटीऑक्सिडंटचे गुणही असतात. चक्रीफुलामध्ये शरीरातील फ्री रॅडिकल्सला नियंत्रणात आणण्याची क्षमता असते. त्यामुळे वाढत्या वयाची लक्षणं रोखण्याचं काम चक्रीफूल करते.

**सर्दी-खोकल्यावर गुणकारी**

कोणत्याही ऋतूमध्ये होणारा आजार म्हणजे सर्दी आणि खोकला. काही जणांना थंड पदार्थांचं सेवन केल्यानंतर लगेच सर्दी-खोकल्याची समस्या निर्माण होते. अशावेळी चक्रीफूल हे फायदेशीर ठरते. चक्रीफुलामध्ये थाइमो आणि एथोल याचे गुणधर्म असतात. त्यामुळे सर्दी किंवा खोकल्यावर चक्रीफूल गुणकारी आहे. त्यासोबतच शरीरामध्ये उष्णता वाढवण्याचं काम चक्रीफूल करते.

**पचनक्रिया सुधारते**

उशिरा जेवण झाल्यामुळे किंवा एखाद्या वेळी चुकीचे पदार्थ खाल्ल्यामुळे अनेक वेळा अपचन, पोटात गॅस होणे, पोटदुखी या सारख्या समस्या निर्माण होतात. मात्र या समस्यांवर तोडगा काढण्यासाठी चक्रीफूल फायदेशीर ठरते. चक्रीफुलामुळे पचनक्रिया सुधारते. त्यामुळे आपल्या आहारात चक्रीफुलाचा समावेश करायला हवा.

**कुठे-कुठे होणार मतदान?**

- **मुंबई महानगर क्षेत्र :** मुंबई, ठाणे, नवी मुंबई, कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर, भिवंडी-निजामपूर, मीरा-भाईंदर, वसई-विरार, पनवेल.
- **उत्तर महाराष्ट्र :** नाशिक, मालेगाव, धुळे, जळगाव, अहिल्यानगर (अहमदनगर).
- **पश्चिम महाराष्ट्रः** पुणे, पिंपरी-चिंचवड, सोलापूर, सांगली-मिरज-कुपवाड, कोल्हापूर.
- **मराठवाडाः** छत्रपती संभाजीनगर, लातूर, परभणी, नांदेड-वाघाळा, जालना.
- **विदर्भ :** नागपूर, अमरावती, अकोला, चंद्रपूर.

**मतदारांसाठी महत्त्वाची माहिती**

- **मतदानाची वेळ :** सकाळी ७:३० ते संध्याकाळी ५:३०.
- **निकाल :** १६ जानेवारी २०२६.
- **मतदान पद्धत :** मुंबईत एका प्रभागातून एकच उमेदवार निवडायचा आहे, तर उर्वरित २८ शहरांत बहुसदस्यीय (एका प्रभागात ३ ते ५ उमेदवार) पद्धत आहे.

# मतदानावेळी गोंधळ घालणाऱ्यांची खैर नाही

## प्रत्येक हालचालीवर करडी नजर, पोलिसांचा मास्टरप्लॅन काय?

**■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

देशाचे लक्ष लागून राहिलेल्या बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी उद्या, १५ जानेवारी २०२६ रोजी मतदान पार पडणार आहे. काल संध्याकाळी ५:३० वाजता जाहीर प्रचाराच्या तोफा थंडावल्या आहेत. त्यामुळे आता छुप्या प्रचाराला वेग आला आहे. मुंबईतील सर्व २२७ वॉर्डांमध्ये सध्या शांततापूर्ण वातावरण पाहायला मिळत आहे. अशाच शांततापूर्व स्थितीत मतदान व्हावे, यासाठी मुंबई पोलिसांनी शहरात अभूतपूर्व सुरक्षा व्यवस्था तैनात केली आहे.

मुंबईतील निवडणूक प्रक्रियेदरम्यान कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी मुंबई पोलीस आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली व्यापक सुरक्षा आराखडा राबवण्यात आला आहे. यानुसार उद्या मुंबईत १० अतिरिक्त पोलीस आयुक्त, ३३ पोलीस उपायुक्त आणि ८४



सहाय्यक पोलीस आयुक्त तैनात असणार आहेत. त्यासोबतच ३,००० हून अधिक पोलीस अधिकारी आणि २५,००० पेक्षा जास्त पोलीस कर्मचारी/होमगार्ड यांचा फौजफाटाही सज्ज असणार आहे.

तसेच मुंबईतील संवेदनशील आणि अतिसंवेदनशील मतदान केंद्रांवर राज्य राखीव पोलीस दल, क्विक रिस्पॉन्स टीम आणि बॉम्ब शोधक व नाशक पथके तैनात असणार आहेत.

मुंबईत उद्या सकाळी ७:३० वाजता मतदानाला सुरुवात होईल. संध्याकाळी ५:३० पर्यंत मतदारांना आपला हक्क बजावता येणार आहे. मतदानाच्या दिवशी मुंबईत सार्वजनिक सुटी जाहीर करण्यात आली आहे. मात्र, शेअर बाजार सुरू राहणार असून सेटलमेंटसाठी पुढील दिवसाचा कालावधी दिला जाईल. मतदानानंतर लगेचच १६ जानेवारी २०२६ रोजी मतमोजणी होणार असून दुपारपर्यंत निकाल स्पष्ट होण्याची शक्यता आहे.

**प्रशासनाचे आवाहन**

उद्याच्या निवडणुकीसाठी निवडणूक आयोगाने मतदारांना मोठ्या संख्येने बाहेर पडून मतदान करण्याचे आवाहन केले आहे. तसेच, मुंबई पोलिसांनी नागरिकांना विनंती केली आहे की, कोणतीही संशयास्पद हालचाल किंवा आचारसंहितेचे उल्लंघन आढळल्यास तात्काळ १०० किंवा ११२ या क्रमांकावर संपर्क साधावा.

# हार्बर मार्गावरील प्रवाशांना मिळणार मोठं गिफ्ट!

## प्रजासत्ताक दिनापासून 'गारेगार' प्रवास

**■मुंबई। प्रतिनिधी,**

मुंबईकरांची लाइफलाइन असलेली रेल्वे अविरत धावत असते. मध्य रेल्वे, पश्चिम रेल्वे आणि हार्बर रेल्वे प्रामुख्याने असे 3 मार्ग असून यावरून दररोज अक्षरशः लाखो लोकं प्रवास करतात. कामावर जाणारे, इतर कामासाठी, फिरण्यासाठी बाहेर पडणारे, अशा अनेकांचा त्यात समावेश असतो. या मार्गांपैकी मध्य आणि पश्चिम रेल्वे मार्गावर आत्तापर्यंत एसी लोकल आल्याने लोकांचा प्रवास थोडा सुखकर झाला होता. मात्र हार्बर रेल्वेच्या प्रवाशांसाठी मात्र ही सुविधा अद्याप सुरू झालेली नव्हती. पण आता हार्बर रेल्वेच्या प्रवाशांसाठी एक मोठी गुड न्यूज समोर आली आहे.



**हार्बर मार्गावरील लोकांचा प्रवास होणार 'गारेगार'**

येत्या २६ जानेवारीपासून म्हणजेच प्रजासत्ताक दिनाच्या दिवशीच हार्बर मार्गावरील प्रवाशांना अखेर एसी लोकलच्या रूपात मोठे गिफ्ट मिळणार आहे. प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून हार्बरच्या प्रवासीसेवेत पहिली एसी लोकल दाखल केली जाणार असल्याची माहिती समोर आली आहे. २६ जानेवारीपासून ही रेल्वे सुरू होणार असून छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (सीएसएमटी) ते पनवेल मार्गावर सोमवार ते शनिवार या दिवसांत एसी लोकलच्या दररोज १४ फेऱ्या धावणार आहेत. अप आणि डाऊन दिशेने एसी लोकलच्या प्रत्येकी ७ फेऱ्या चालवण्यात येणार असल्यामुळे हार्बरचा प्रवास गारेगार होणार आहे. सध्या फक्त पश्चिम रेल्वे आणि मध्य रेल्वेच्या मेन लाईनवर एसी लोकल धावतात, त्यामुळे प्रवाशांना या लोकलचा लाभ घेता येतो. मात्र हार्बर मार्गावरील नागरिकांना कित्येक दिवसांपासून एसी लोकलची प्रतीक्षा होती. अखेर हार्बरच्या प्रवाशांचे एसी लोकलमधून प्रवास करण्याचे स्वप्न पूर्ण होणार असून त्यांनाही गारेगार प्रवासाची अनुभूती घेता येणार आहे.

# मतदानाच्या पार्श्वभूमीवर मुंबईत वाहतूक नियोजनात बदल... काही मार्गांवर प्रवेश मर्यादित

**■मुंबई। प्रतिनिधी,**

राज्यातील महानगरपालिका निवडणुकांसाठी उद्या मतदान होणार असून, या प्रक्रियेच्या सुरळीत अंमलबजावणीसाठी मुंबई शहरात वाहतुकीसंदर्भात विशेष नियोजन करण्यात आले आहे. कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी आणि निवडणूक यंत्रणेच्या हालचाली सुलभ करण्यासाठी काही भागांतील रस्ते तात्पुरते वापरासाठी बंद ठेवण्यात येणार आहेत.

पोलीस प्रशासनाकडून मिळालेल्या माहितीनुसार, बुधवारपासूनच काही प्रमुख मार्गांवर वाहतूक नियंत्रण लागू करण्यात आले असून हे निर्बंध शनिवारच्या मध्यरात्रीपर्यंत कायम राहणार आहेत. या कालावधीत वाहनचालकांना पर्यायी मार्गांचा वापर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

दादर पश्चिमेकडील भागात बुधवार १४ जानेवारी रोजी सकाळी ८ वाजल्यापासून ते शुक्रवार, १६ जानेवारी रोजी ११ वाजेपर्यंत



राव बहादूर एस. के बोले मार्ग, अशोक वृक्ष रोड आणि रानडे रोडवर प्रवेश आणि पार्किंग करण्यास इतर नागरिकांना मनाई करण्यात आली. फक्त रहिवासी आणि अत्यावश्यक सेवेतील वाहनांनाच परवानगी असेल. वरळीतल्या डॉ. ई. मोझेस रोडवर शुक्रवारी (१६ जानेवारी ) सकाळी ५ वाजल्यापासून मध्यरात्रीपर्यंत प्रवेश आणि पार्किंगला बंदी असेल कारण बृहन्मुंबई महानगर पालिकेच्या अभियांत्रिकी केंद्रातील स्ट्रॉंग रूममध्ये मतमोजणी सुरु आहे. त्यामुळे प्रवाशांना इतर पयार्यी मार्ग सुचवण्यात आले आहेत.

वरळी येथील जी.एम.भोसले मार्गावर बुधवारी रात्री १२:०१ वाजेपासून गुरुवार मध्यरात्रीपर्यंत इलेक्ट्रॉनिक ईव्हीएम व्होटिंग मशिनचे वितरण आणि संकलन महत्त्वाचे असणार आहेत. सांताक्रूझसह पश्चिम उपनगरांमध्येही अशाच प्रकारचे निर्बंध असतील. सार्वजनिक रस्त्यांजवळील अनेक मतदान केंद्रांमुळे गुरुवारी एनएस रोड क्रमांक ०६ आणि टीपीएस रोड क्रमांक ०३ तात्पुरते बंद राहतील. शुक्रवारी मतमोजणीमुळे सांताक्रूझमधील रिलीफ रोड पूर्णपणे बंद राहील. बृहन्मुंबई महानगर पालिका निवडणूक २०२६ सुरक्षित आणि सुरळीत पार पाडण्यासाठी शहरात २८००० हून अधिक पोलिस कर्मचारी तैनात केले जाणार आहेत. यामध्ये ३००० पोलिस अधिकारी आणि २५००० पोलिस कर्मचारी तैनात केले जाणार आहेत. पश्चिम उपनगरातील सांताक्रूझ परिसरातही मतदान केंद्रांच्या आसपास काही रस्त्यांवर तात्पुरते निर्बंध लागू राहणार आहेत. मतमोजणीच्या दिवशी एका प्रमुख मार्गावर पूर्णतः वाहतूक थांबवण्यात येणार आहे.

# जुहू परिसरातील ३५ हजार मुंबईकरांचा मतदानावर बहिष्कार



**काय आहे बहिष्काराचे कारण?**

जुहू परिसरात मिलिटरी रडार सिस्टिम आहे. संरक्षण विभागाकडे ही व्यवस्था आहे, याचा फटका येथील नागरिकांना बसत आहे. ३५ वर्षांपासून येथील २०० इमारती आणि या भागातील दोन झोपडपट्ट्यांचा विकास होऊ शकलेला नाही. इमारतींचा पुनर्विकास होत नसल्यामुळे मोडकळीस आलेल्या इमारतींमध्ये भीतीच्या सावटाखाली येथील नागरिकांना राहावे लागत आहे. जुहू परिसरातील या नागरिकांनी त्यांची समस्या केंद्र सरकारच्या संरक्षण विभागाच्याही निदर्शनास आणून दिली आहे. त्यासाठी विविध ठिकाणी पाठपुरावा केला, मात्र इमारतींच्या पुनर्विकासाचा मुद्दा पुढे सरकलेला नाही.

**■मुंबई। प्रतिनिधी,**

मुंबई महापालिकेसाठी १५ जानेवारी रोजी मतदान होणार आहे. नागरिकांनी मोठ्या प्रमाणात मतदान करावे यासाठी निवडणूक आयोगाकडून आवाहन केले जात आहे. राजकीय पक्ष देखील नागरिकांनी मतदान करावे असे आवाहन करत आहेत. जुहू परिसरातील ३५ हजार नागरिकांनी मात्र मतदानावर बहिष्कार टाकण्याची घोषणा केली. या परिसरात राहाणाऱ्या जवळपास २०० इमारतीमधील नागरिकांनी बहिष्काराचा निर्णय घेतला आहे. तशा आशयाचे बॅनर आणि पोस्टर जुहू रुईया पार्क, कराची सोसायटी या परिसरात लागले आहेत.

**ब्रिटीश कायद्यामुळे...**

जुहू परिसरात मिलिटरी रडार आहेत. येथे १९३९ च्या ब्रिटीश कायद्याप्रमाणे, ज्याची अंमलबजावनी १९७६ मध्ये झाली. त्या कायद्यांतर्गत आम्हाला आमच्या कायदेशीर घरांमधून हकलण्यात आले, असा आरोप नागरिकांचा आहे. यामुळे २०० इमारती, दोन मोठ्या झोपडपट्टी आणि येथे राहाणारे जवळपास ३५ हजार नागरिक यांच्यावर अन्याय होत असल्याचा त्यांचा आरोप आहे. त्यामुळे यंदाच्या निवडणुकीत खोटी आश्वासने चालणार नाही, असे सांगत नागरिकांनी मतदानाला बाहेर पडण्यापूर्वी एकदा विचार करावे असे आवाहन पोस्टर्स आणि बॅनरमधून करण्यात आले आहे.

राजकीय पक्षांनी नागरिकांना लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीतही आश्वासन दिले होते. मात्र निवडणुकीनंतर कोणताही नेता मदतीला आला नसल्याचे येथील रहिवासी सांगतात. त्यामुळे आता निवडणुकीच्या मतदानावरच बहिष्काराचे अस्त्र नागिरकांनी बाहेर काढले आहे.

ठाकरेंची शिवसेना आणि राज ठाकरेंच्या मनसे युतीचे संदेश देसाई येथून उमेदवार आहेत. त्यांनी नागरिकांना निवडणुकीनंतर ठाकरे बंधूंची भेट घालून देतो. आम्ही या समस्येतून मार्ग काढू असे आश्वासन दिले आहे. मात्र इतर उमेदवारांकडून नागरिकांच्या बहिष्कार आंदोलनाची दखलही घेतलेली नाही. प्रभाग क्रमांक ६८ मधील जुहू परिसरातील ही समस्या आहे.

# शेजाऱ्याने फूस लावून निर्जनस्थळी नेलं अन्...

## मारहाणीत पीडितेच्या आईचा गर्भपात

**■मुंबई। प्रतिनिधी,**

बिहारमध्ये एका 5 वर्षांच्या मुलीवर लैंगिक अत्याचाराचा प्रयत्न करण्यात आल्याची बातमी समोर आली आहे. इतकेच नव्हे तर, पीडितेच्या नातेवाईकांनी याचा विरोध केल्यास त्यांना मारहाण करण्यात आली आणि या हाणामारीत मुलीच्या आईचा गर्भपात झाल्याचं सांगितलं जात आहे. संबंधित प्रकरण हे बिहारच्या मुजफ्फरपूर जिल्ह्यातील आहे. येथील गावात एका 5 वर्षीय मुलीवर तिच्या शेजारी राहणाऱ्या तरुणाने लैंगिक अत्याचार करण्याचा प्रयत्न केला. दरम्यान, पीडितेचा आरडाओरडा ऐकून आसपासचे लोक घटनास्थळी पोहोचले आणि त्यावेळी, आरोपी तिथून फरार झाला. घटनेनंतर, पीडितेचे नातेवाईक आरोपीच्या घरी गेल्यानंतर त्यांच्यासोबत मारहाण करण्यात आली. पीडित मुलीची आई गर्भवती होती आणि मारहाणीदरम्यान तिचा गर्भपात झाला. संबंधित प्रकरणाची तक्रार मिळताच, पोलिसांनी तातडीने कारवाई करत मंगळवारी पाच आरोपींना अटक केल्याची माहिती आहे. यामध्ये, राजेश दास, मिथिलेश दास, रिंकू देवी आणि सरिता देवी या आरोपींचा समावेश आहे.



# ठाण्यातील २१ वर्षीय एअर होस्टेसने संपवलं आयुष्य

**■मुंबई। प्रतिनिधी,**

ठाणे जिल्ह्यातून एका २१ वर्षीय एअर होस्टेसने आत्महत्या केल्याची बातमी समोर आली आहे. त्यानंतर, पोलिसांनी पीडितेच्या एक्स बॉयफ्रेंडवर तिला आत्महत्येसाठी प्रवृत्त केल्याच्या आरोपाखाली गुन्हा दाखल केला आहे. संबंधित तरुणीने २८ डिसेंबर २०२५ रोजी कल्याण (पूर्ण) येथील तिच्या घरी फाशी घेत आत्महत्या केल्याची माहिती आहे.

प्रेयसीचे प्रायव्हेट फोटो व्हायरल करण्याची धमकी

अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, पीडितेला तातडीने रुक्मिणीबाई रुग्णालयात नेण्यात आलं. तिथे डॉक्टरांनी तिला मृत घोषित केलं. कुटुंबियांच्या म्हणण्यानुसार, मृत तरुणी आणि तिचा एक्स बॉयफ्रेंड २०२० पासून प्रेमसंबंधात होते. आरोपानुसार, तिच्या प्रियकराने तिला तिचे काही प्रायव्हेट फोटो व्हायरल करण्याची धमकी दिली होती आणि लग्न करण्यासाठी नकार दिला होता. इतकेच नव्हे तर, तो नुकतंच एका दुसऱ्या महिलेसोबत प्रेमसंबंधात होता आणि त्यामुळेच, तिने स्वतःचं आयुष्य संपवलं.

अंत्यसंस्कार झाल्यानंतर, कुटुंबियांनी तिचा फोन आणि बँक स्टेटमेंट तपासले, ज्यामध्ये बऱ्याच बाबी उघडकीस आल्या. तिच्या शरीरावर सापडलेल्या चॅट रेकॉर्ड आणि खुणांवरून आरोपीने तिच्यावर वारंवार हल्ला केला असल्याचं दिसून आलं. मिळालेल्या माहितीनुसार, पीडितेच्या प्रियकराने लग्नाच्या बहाण्याने तिच्याकडून लाखो रुपये घेतले होते आणि १६ डिसेंबर २२५ रोजी तिचं शेवटचं ट्रान्सझेक्शन झाल्याचं तरुणीच्या बँक अकाउंटवरून स्पष्ट झालं.

तक्रारीच्या आधारे, पोलिसांनी भारतीय दंड संहितेच्या (आयपीसी) कलम १०८ अंतर्गत त्या व्यक्तीविरुद्ध एफआयआर दाखल केला असल्याची माहिती पोलीस अधिकाऱ्यांनी दिली. पोलिस या प्रकरणाचा अधिक तपास करत असल्याचं सांगितलं जात आहे.

**छताला लटकलेल्या अवस्थेत आढळली**

अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, तरुणीचा मोबाईल फोन आणि आर्थिक रेकॉर्ड तपासल्यानंतर, कोळसेवाडी पोलिसांनी १० जानेवारी रोजी तिच्या २३ वर्षीय माजी जोडीदाराविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल केला. तक्रारीनुसार, २८ डिसेंबर रोजी रात्री तरुणीला तिच्या आईने फोन केला असता तिला त्याचं उत्तर मिळालं नाही. त्यानंतर, त्यानंतर कल्याणमधील अनुसूया निवास येथील तिच्या घरी जाऊन पाहिल्यानंतर छताच्या हुकला लटकलेला तरुणीचा मृतदेह आढळला.

# मृतदेहाचे तुकडे खाण्यासाठी अज्ञात व्यक्तीची केली हत्या



**■मुंबई। प्रतिनिधी,**

पश्चिम बंगालच्या कूचबिहार जिल्ह्यात एक धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. एका व्यक्तीने मृतदेहाचे तुकडे खाण्यासाठी एका अज्ञात व्यक्तीची हत्या केली. पोलीस अधिकाऱ्यानं दावा केला की, चौकशीदरम्यान, आरोपीने पीडितेचं मांस खाण्याच्या हेतूने हत्या केल्याचा कबुलीनामा दिला. ही घटना कूचबिहार जिल्ह्यातील दिनहाट येथील कुर्शत परिसरात घडली, यामुळे स्थानिकांमध्ये भीतीचं वातावरण पसरलं.

**नेमकं काय घडलं?**

पोलिसांनी सांगितलं की, मृताची अद्याप ओळख पटवण्याचा पोलीस प्रयत्न करत आहेत. मृत व्यक्ती ही परिसरातील स्मशानभूमीजवळील असलेल्या एका झोपडीत राहत होती. कुर्शात येथील एका तलावत तो मृतावस्थेत आढळला. वृत्तानुसार, मतदेह आढळून आल्यानंतर पोलिसांनी तपास सुरु केला. संशयित आरोपीचं नाव दौस आलम असल्याचं सांगण्यात येत आहे. या प्रकरणी पोलिसांनी त्याला अटक केली आहे.

**आरोपीने 'त्या' गोष्टीसाठी अज्ञात व्यक्तीची केली हत्या**

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी दारूच्या नशेत असून या प्रकरणात पोलिसांनी दावा केला की, आरोपीने अज्ञात व्यक्तीची हत्या करण्यात आली होती, नंतर मृतदेह हा पाण्याच्या टाकीत नेला, तो स्वच्छ करत लपवण्यात आला. चौकशीदरम्यान. आरोपीने हत्येचा कबुलीनामा दिल्याची माहिती समोर आली आहे. आरोपीने मानवी मांस खाण्याच्या उद्देशाने ही हत्या केली. हे नरभक्षकाचे लक्षण असल्याची दुर्मिळ घटना घडली आहे.

यानंतर त्यांनी पुढे सांगितलं की, स्थानिक सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार आरोपीबाबतची माहिती मिळाली, नंतर त्याला अटक केली. सध्या या प्रकरणाची सखोल चौकशी केली जात आहे.

**नेमकं काय झालं?**

लोकलचे बनावट तिकीट घेऊन प्रवास करणाऱ्या प्रवाशांमध्ये वाढ होत असल्याचे चित्र गेल्या काही दिवसांपासून दिसत आहे. मध्य आणि पश्चिम या दोन्ही रेल्वे मार्गावर फसवणुकीच्या अनेक घटनाही घडल्या आहेत. त्यामुळे टीसींनी ( तिकीट तपासनीस) अशा बनावट प्रवाशांविरोधात तपासणी मोहीम तीव्र केली असून शुक्रवारी चर्चगेट-विरार लोकल मार्गावर या तपासणीदरम्यान एक बनावट लोकल तिकीट (यूटीएस पास) टीसींनी पकडलं. जलद चर्चगेट लोकलमधील महिलांच्या प्रथम श्रेणीच्या डब्यात दीपिका मूर्ती तिकीट तपासत होत्या. तेव्हा एका तरूणीने त्यांना मोबाईलवरचा पास दाखवला. त्याची मुदत १ जानेवारी ते ३१ जानेवारी २०२६ होती.

# लव्ह के लिए साला कुछ भी करेगा! गर्लफ्रेंडला खुश करण्यासाठी 'भन्नाट' आयडिया!

**■मुंबई। प्रतिनिधी,**

प्रेम आंधळं असतं असं म्हणतात. एखादी व्यक्ती प्रेमात पडली की त्यासाठी ती काहीही करू शकते. आपल्या प्रेयसीला चांद-तारें तोडून आणून देण्याची भाषा करणारे अनेक प्रियकर आपण पाहिलेत, मोठ्या पडद्यावरही अशी अनेक वचनं प्रेयसीला त्यांचे प्रियकर देताना दिसले. पण रोजच्या धकाधकीच्या आयुष्यात आपल्या प्रेयसीसाठी भवन्नाट आयडिया करून तिला एसी लोकलचा बनावट पास तयार करू देणाऱ्या एका भामट्या प्रियकराची आयडिया पाहून मात्र पोलीसही थक्क झाले. पण कानून के हात लंबे होते है या न्यायाने अखेर फसवणूक करणाऱ्या त्या इसमाविरोधात आणि त्याच्या मैत्रिणीविरोधातही गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एसी लोकलचा बनावट पास आणि त्यासाठी बनावट यूटीआय ॲप तयार करण्यात आल्याचा आरोप त्यांच्यावर आहे. याप्रकरणी दोघांविरोधात वांद्रे पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून तपास सुरू आहे.

मात्र ते पाहून तिकीट तपासनीस मूर्ती यांना थोडं संशयास्पद वाटलं. त्यांनी ती प्रवासी महिला प्रीती हिच्याकडे विचारणा केली. पण तिने नीट न सांगता, उडवाउडवीची उत्तरं दिली. ज्यामुळे टीसीचा संशय आणखीनच वाढला. म्हणून पुढील तपासणीसाठी त्यांनी तिला वांद्रे येथे उतरवलं आणि डीसीटीआय कंट्रोलद्वारे तिची चौकशी करण्यात आली. तेव्हा तिच्या मोबाईलवर असलेला यूटीआय पास हाँ खरा नसून खोटा, बनावट असल्याचे स्पष्ट झाले. ते पाहून अनेकांना धक्का बसला. त्या महिलेला खडसावण्यात आल्यावर अखेर तिने तो पास खोटा असल्याचे आणि एका मित्राने बनवून दिल्याचं कबूल केलं. त्याने तिला व्हॉट्सॲपद्वारे एक बनावट यूटीएस ॲप्लिकेशन पाठवल्याचंही तिने सांगितलं, अशी माहिती पश्चिम रेल्वेच्या अधिकाऱ्यांनी दिली.

हे प्रकरण उघडकीस आल्यावर त्यांनी ती प्रवासी महिला आणि बनावट ॲप तयार करणारा तिचा अभियंता मित्र अनुज गुप्ता या दोघांविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल केला. वांद्रे पोलिस याप्रकरणात आणखी तपास करत आहेत.





# पत्नी अन् आईचं डोकं वीटेने ठेचून खून केला, अन् सिकंदर गुप्ता दोघींचं मांस खात होता... पोलिसांना भयंकर दृश्य दिसलं

**■मुंबई। प्रतिनिधी,**

पत्नी आणि स्वतःच्या आईची अत्यंत अमानुषपणे हत्या करुन युवकाने त्यांचं मांस खाल्ल्याची धक्कादायक घटना कुशीनगर जिल्ह्यात उघडकीस आली आहे. सिकंदर गुप्ता असं या दुहेरी हत्याकांडांतील आरोपीचे नाव आहे. ३२ वर्षीय सिकंदर गुप्ता मुंबईत शटरिंगचे काम करणारा करायचा. काही महिन्यांपूर्वीच आपल्या मूळ गावी परसा येथे परतला होता. मात्र, परतल्यानंतर घडलेल्या या घटनेने संपूर्ण गाव हादरून गेलं आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, १२ जानेवारी रोजी सकाळच्या सुमारास सिकंदर गुप्ता आपल्या ६० वर्षीय आई रूना देवी आणि पत्नी प्रियंका यांच्यासोबत घराच्या छतावर शेकटी पेटवून ऊब घेत बसला होता. यावेळी सिकंदर दारूच्या नशेत असल्याचं सांगितलं जात आहे. याच दरम्यान पती-पत्नीमध्ये कोणत्या तरी कारणावरून वाद झाला. हा वाद काही वेळातच टोकाला गेला. यावेळी रागाच्या भरात सिकंदरने जवळच असलेला दगड उचलून पत्नी प्रियांकाच्या डोक्यावर जोरदार घाव घातला. या हल्ल्यात प्रियंका गंभीर जखमी झाली. हा प्रकार पाहून आई रूना देवी घाबरल्या आणि



त्यांनी मुलाला थांबवण्याचा प्रयत्न केला. मात्र, संतापलेल्या सिकंदरने आईलाही सोडलं नाही. त्याने त्याच दगडाने आईच्या डोक्यावरही वार केला. इतक्यावरच सिकंदर थांबला नाही. तो दोघींच्या डोक्यावर दगडाने घाव घालत राहिला. काही वेळात दोघींचाही मृत्यू झाला आणि त्या रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या पाहायला मिळाल्या.

घटनेदरम्यान मोठा गोंधळ आणि आरडाओरड झाली. शेजाऱ्यांना संशय येताच त्यांनी तात्काळ पोलिसांना माहिती दिली. मात्र, पोलिस घटनास्थळी पोहोचताच सिकंदर अधिकच आक्रमक झाला. त्याने छतावरून पोलिसांवर दगडफेक केली. मोठ्या प्रयत्नांनंतर पोलिसांनी छतावर जाऊन त्याला ताब्यात घेतलं. त्यावेळी सिकंदरच्या हातांवर रक्त पडलेलं होतं. पोलिसांनी सांगितलं की, छतावर दोन्ही महिलांचे मृतदेह विद्रूप अवस्थेत पडले होते. काही प्रत्यक्षदर्शींनी आरोपी मृतांचं मांस इथे-तिथे फेकत असल्याचंही सांगितलं.

अटक केल्यानंतर मेडिकल तपासणीसाठी सिकंदरला रुग्णालयात नेण्यात आलं. तेथेही त्याने असभ्य वर्तन केलं. त्याने डॉक्टरांच्या तोंडावर थुंकल्याचं सांगितलं जात आहे. धक्कादायक बाब म्हणजे, थुंकताना त्याच्या तोंडातून रक्तासह मांसाचा तुकडाही बाहेर पडल्याचं सूत्रांनी सांगितलं. त्यामुळे हत्या केल्यानंतर मृतांचं मांस खाल्ल्याचीही भीती व्यक्त केली जात आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपीची मानसिक अवस्था संशयास्पद वाटत होती. मात्र, वैद्यकीय तपासणीत तो नॉर्मल असल्याचं समोर आलं. सिकंदर आणि प्रियंका यांच्या लग्नाला काही वर्षे झाली होती, मात्र त्यांना अपत्य नव्हतं. याच कारणामुळे सिकंदर मानसिक तणावात होता आणि तो मोठ्या प्रमाणात दारू पित असल्याचंही पोलिसांनी सांगितलं. कुशीनगरचे अपर पोलीस अधीक्षक सिद्धार्थ वर्मा यांनी सांगितलं की, दोन्ही मृतदेहांचं पोस्टमॉर्टम करण्यात आलं असून आरोपी सिकंदर गुप्ताला अटक करून न्यायालयीन कोठडीत पाठवण्यात आलं आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सुरू असून कायदेशीर कारवाई केली जात असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबंधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४०००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com